महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

# अनिल गोटे

माजी आमदार
घर नं. 1321, ग.नं. 4, धुळे 424001
+91 98501 09100, +91 8888330066
+91 9421883366
goteanil@gmail.com

पत्रक क्र. ७६
धुळे दि. २०/०६/२०२५

गुलमोहर घबाड प्रकरणाची आता सोमवार दिनांक २३ जून रोजी सुनावणी. माननीय मुख्य न्याय दंडाधिकारी श्रीमान चौगुले साहेब यांनी आज जिल्हा पोलीस उप अधीक्षक यांना सोमवारी माननीय न्यायालयासमोर कागदपत्रांसह उपस्थित राहण्यास सांगितले आहे.

सदर गुन्ह्यात पोलीसांनी अदखलपात्र नोंद केल्याने, माननीय न्यायमूर्ती श्री. चौगुले साहेब यांचे न्यायालयात शिवसेना नेते व कार्यसम्राट माजी आमदार माननीय अनिल अण्णा गोटे यांनी दाखल केला आहे. सदर गुन्ह्याला अदखलपात्र कलम लावणे म्हणजे सदर गुन्हा दडपून टाकण्याकरता सरकारच्या कटात सहभागी होणे. असे माननीय न्यायालयासमोर आपली बाजू मांडत असताना अनिल अण्णा गोटे यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.

माननीय न्यायमूर्ती यांनी पोलीस अधिकारी आपल्याकडे सदर गुन्ह्याच्या तपासाच्या परवानगीसाठी आले असता ‘‘सदर अधिकाऱ्यांना हा अदखलपात्र गुन्हा कसा होऊ शकतो? असे विचारले असता ते माझे समाधान करू शकले नाहीत.’’

पुढे माननीय न्यायमूर्ती चौगुले साहेबांनी असे म्हटले की सोमवारी मी या प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी व आपणांसमोर खुल्या न्यायालयात सुनावणी घेणार आहे.

शिवसेना नेते माजी आमदार अनिल अण्णा गोटे यांनी फार जोरदारपणे आपली भूमिका मांडली. सरकारतर्फे कोणी वकील माननीय न्यायालयात उपस्थित नव्हते. माननीय न्यायालयाने सोमवार दिनांक २३ जून रोजी सर्व संबंधित वकिलांनी उपस्थित राहण्याबद्दल आदेश दिले आहेत.

दरम्यानच्या काळात मनोहर चित्र मंदिराजवळील, अनधिकृत व कायदे झुगारून होत असलेल्या चबुतऱ्याच्या बांधकामाबाबत माननीय न्यायाधीश चव्हाण साहेब यांचे न्यायालयात दाखल केलेल्या खटल्यात माननीय न्यायालयाने ‘‘सदर खटला मी फेटाळल्यामुळे तुमचे व्यक्तिगत काहीही नुकसान होणार नाही’’ तसेच महानगरपालिकेचे आयुक्तांनी दाखल केलेले ‘‘प्रतिवादीचे म्हणणे जसेच्या तसे स्वीकारले आहे.’’ असा निर्णय दिलेला आहे. या पार्श्वभूमीवर चबुतऱ्याचे काम आहे त्या परिस्थितीत चालू राहील असे सध्यातरी दिसून येते.

अशी माहिती अनिल अण्णा गोटे यांचे स्वीय सहाय्यक श्री तुषार मराठे, रा. धुळे यांनी आज एका पत्रकाद्वारे प्रसिद्धीस दिली आहे.

आपला

तुषार मराठे